**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरातच्या दौऱ्यावर / १९ हजार ८०६ कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या विकास कामांचं करणार लोकार्पण आणि भूमिपूजन

- महावीर जयंतीनिमित्त देशभरात धार्मिक कार्यक्रम आणि शोभायात्रांचं आयोजन

- १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकरता महाराष्ट्राला दुसऱ्या टप्प्यात १०९ कोटी रुपये वितरित

**आणि**

- मुंबई महानगरपालिका आयुक्त पदासाठी मेट्रोवुमन अश्विनी भिडे यांचं नाव निश्चित

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरातच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. वाव-थराद इथं १९ हजार ८०६ कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या विकास कामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यातले १० हजार ९२१ कोटी रुपये खर्चाचे प्रकल्प ऊर्जा क्षेत्र, रस्ते वाहतूक आणि महामार्ग तसंच रेल्वे मंत्रालयाशी संबंधित आहेत. याशिवाय, गुजरात सरकारच्या नगर विकास, जलसंपदा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इमारती, गुजरात औद्योगिक विकास महामंडळ, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पर्यटन आणि आदिवासी विकास विभागांशी संबंधित ८ हजार ८८६ कोटी रुपयांच्या विकास कामांचाही प्रारंभ मोदी यांच्या हस्ते होणार आहे. गांधीनगर इथल्या सम्राट संप्रति संग्रहालयाचं उद्घाटन महावीर जयंती निमित्त आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. देशाच्या उज्ज्वल परंपरा आणि इतिहासाचं ज्ञान भविष्यातल्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी बळ देतं असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट**

यानंतर ते अहमदाबाद जिल्ह्यात साणंद इथं केन्स सेमीकॉन प्रकल्पाचं उद्घाटन करणार आहेत.

<><><><><>

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत  आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महावीर जयंती निमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीरांच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊन अधिक संवेदनशील, शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाज घडवण्यासाठी सतत प्रयत्न करावेत असं राष्ट्रपती द्रौपदीही मुर्मू यांनी म्हटलं आहे.

भगवान महावीरांची कालातीत शिकवण सर्वांना आत्मशिस्त, करुणा आणि सलोख्याच्या जीवनासाठी मार्गदर्शन करत असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

भगवान महावीर यांचे आदर्श आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत करणारे असून ते आजच्या जगातही अत्यंत समर्पक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह,  लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी ही महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

महावीर जयंतीच्या सुट्टीमुळे देशांतर्गत शेअर बाजार आज बंद आहे तर वस्तू बाजार सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

<><><><><>

जनगणनेची प्रक्रिया उद्यापासून सुरू  होणार असून, नागरिकांना स्व-नोंदणी पोर्टलद्वारे दोन्ही टप्प्यांत माहिती देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. देशातली

ही १६वी जनगणना असून पहिल्या टप्प्यात प्रत्येक घराची माहिती गोळा केली जाईल. त्यात घराचा क्रमांक, मजला, घराची स्थिती आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींची संख्या अशा माहितीचा समावेश असेल. या प्रक्रियेत घरप्रमुखाचे नाव, लिंग, जात, मालकी हक्क, तसंच घरातील विवाहित जोडप्यांची संख्या आणि वाहनांची माहितीही नोंदवली जाणार आहे. जर एखादं जोडपं लिव्ह-इन संबंधाला कायमस्वरूपी आणि विश्वासार्ह नातं मानत असेल, तर त्यांची गणना विवाहित जोडप्यामध्ये केली जाईल असं या पोर्टलमध्ये म्हटलं आहे. पोर्टलवर वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी उपलब्ध आहे, त्यामुळे जनतेला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरं देणं सोपं जाईल.

<><><><><><>

पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम या राज्यांत आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात एप्रिल महिन्यात विधानसभा निवडणुका होत आहेत.

आसाममध्ये ८५ वर्षांवरचे ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची सोय उपलब्ध असून त्याद्वारे मतदान सुरू झालं आहे. ही प्रक्रिया पाच एप्रिलपर्यंत पूर्ण होणार आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली असून, तेरा उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. भारताचा दिग्गज टेनिसपटू लिअँडर पेसनं आज तृणमूल काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केला. यावेळी पश्चिम बंगालमधले भाजपाचे वरिष्ठ नेते उपस्थित होते.

दरम्यान तामिळनाडूत निवडणूक प्रचाराला आता वेग आला आहे. एआयएडीएमकेचे नेते एडप्पडी के. पलनीस्वामी यांनी तामिळनाडूतल्या कोविलपट्टी इथं आज प्रचारसभा घेतली. काडेपेटी उद्योगासाठी जीएसटी अर्थात वस्तू आणि

सेवा कर १८ टक्क्यांवरून १२ टक्क्यांवर आणण्याची मागणी केली असून, कामगारांसाठी कल्याण मंडळ स्थापन करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिलला दोन टप्प्यांत मतदान होईल. तमिळनाडूमध्ये २३ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होईल. केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी इथं ९ एप्रिलला मतदान होईल. निकाल ४ मे रोजी जाहीर होतील

<><><><><><>

डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांनी  प्रभावित भागांमधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकास पोहोचत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. देश नक्षलवाद मुक्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबाबत लोकसभेत झालेल्या चर्चेला काल त्यांनी उत्तर दिलं. शस्त्र उचलणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असं शहा यांनी स्पष्ट केलं.

नक्षलग्रस्त १२ राज्यांमध्ये डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांमुळे २० हजार लोकांचा मृत्यू झाला आणि जवळपास १२ कोटी लोक अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिले, असं शहा म्हणाले. नक्षलवाद नष्ट करून या भागात विकासाची गंगा पोहोचवण्यासाठी गेल्या १२ वर्षात केलेल्या विविध उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली. २०२४ते मार्च २०२६ या कालावधीत ७०६ नक्षलवादी चकमकीत ठार झाले, २ हजार २१८नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली, तर ४ हजार ८३९नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करलीअशी माहिती त्यांनी दिली. नक्षलवादाविरुद्धच्या मोहिमेत प्राण गमावलेल्या जवानांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

<><><><><><>

नक्षलवादाविरोधातल्या लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद काल झाली,त्यावेळी ते बोलत होते. माओवादी कारवाया आता राज्यात नगण्य पातळीवर आल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. यामुळे, किमान तीन वर्षे सी-60 मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासन विशेष 'सी-60 पदक' देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. पोलीस तपासामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजे AI चा वापर वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

पंचायती राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार अनुदानाला मंजुरी देऊन केंद्र सरकारनं निधी वितरित केला आहे. महाराष्ट्राला पंचायती राज संस्थांसाठी अनुदानातल्या पहिल्या आणि दुसऱ्या हप्त्यांमधून प्रत्येकी १०९ कोटी रुपये वितरित झाले आहेत. हा निधी २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रासह तेलंगणा, राजस्थान, उत्तराखंड आणि मिझोराम या राज्यांना मिळणार आहे. या अनुदानामुळे गावपातळीवर प्रशासन अधिक सक्षम होईल आणि गरजेनुसार विकासकामं राबवता येतील. तेलंगणाला १२ हजार ६०० ग्रामपंचायतींसाठी पहिल्या हप्त्यात तब्बल २४७ कोटी रुपये देण्यात आले आहेत. उत्तराखंडला दुसऱ्या हप्त्यात ९१ कोटी रुपये मिळाले असून, याचा लाभ १३ जिल्हा परिषद, ९५ ब्लॉक परिषद आणि जवळपास ८ हजार ग्रामपंचायतींना होणार आहे. मेघालयलाही २०२१-२२ या आर्थिक वर्षात दुसऱ्या हप्त्यात २७ कोटी रुपये मिळाले आहेत. ठराविक उद्दिष्टांसाठी मर्यादित निधी आणि स्थानिक गरजेनुसार वापरता येणारा निधी असे दोन प्रकारचा हा निधी आहे.

**<><><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी सध्या मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव असलेल्या अश्विनी भिडे यांचं नाव निश्चित झालं आहे. १९९५ च्या तुकडीतल्या आयएएस अधिकारी अश्विनी भिडे यांनी मुंबईत मेट्रो ३ म्हणजेच ॲक्वा लाईन सुरु करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आयुक्त भूषण गगरानी आज निवृत्त होणार असून त्यांच्या जागी भिडे आयुक्तपदाचा पदभार स्वीकारतील.

<><><><><><>

जीआरएसई म्हणजेच गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स लिमिटेडनं भारतीय नौदलाकडे ‘दुनागिरी’, ‘संशोधक’ आणि ‘अग्रे’ या तीन महत्त्वाच्या युद्धनौका सुपूर्द केल्या. यावेळी उप-नौदलप्रमुख गौतम मारवाह आणि वरिष्ठ नौदल अधिकारी शिशिर दीक्षित उपस्थित होते.

<><><><><><>

IPL क्रिकेटमध्ये, पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स हा सामना आज चंडीगडमधे होणार आहे. काल गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा आठ गडी राखून पराभव केला. चेन्नई सुपरकिंग्सनं विजयासाठी ठेवलेलं १२८ धावांचं लक्ष्य१३ व्या षटकांतच पार केलं. राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशीने १७ चेंडूंत ५२ धावांची वेगवान खेळी केली. राजस्थान रॉयल्सचा नँद्रे बर्गर 'सामनावीर' ठरला.

//<><><><><><>//